# विपश्यना

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

**बुद्धवर्ष २५५७, आषाढ़ पौर्णिमा, २२ जुलै, २०१३ वर्ष २ अंक ५**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**पुञ्ञञ्चे पुरिसो कयिरा, कयिरा नं पुनप्पुनं।**
**तम्हि छन्दं कयिराथ, सुखो पुञ्ञस्स उच्चयो॥**
*धम्मपद- ११८, पापवग्गो.*

जर पुरूष (कधी ) पुण्य (कर्म) करेल, तर त्याला वारंवार करो. तो त्या प्रती उत्साह जागवो, (कारण) पुण्या (कर्मां) चा संचय सुख (चे कारण) होते.

## सयाजी ऊ बा खिनांची कीर्तिकाया

*(क्रमशः ...)*

▸▸ अजून एक अत्यंत महत्वपूर्ण कार्य - हे जे गुरूदेव सयाजी ऊ बा खिनांच्या **ऐतिहासिक स्मारकाच्या** स्वरूपात मुंबईत विशाल **'विपश्यना स्तूपाचे** निर्माण कार्य पूर्ण झाले, ज्याचा उपयोग केवळ विपश्यना साधनेसाठीच होईल. ह्यामुळे गुरूदेवांच्या धर्म-स्वप्नाला पूर्ण करण्यात मदत मिळेल. ह्याच्या विशाल धर्मकक्षात हजारोंच्या संख्येने विपश्यी साधक-साधिका, सामूहिक साधनेचा अथवा एक दिवसीय शिबिराचा लाभ प्राप्त करतील. हे सहज अनुमान केले जाऊ शकते की जेथे ५०-१०० साधकांच्या सामूहिक साधनेने साधकांना इतका लाभ प्राप्त होतो, तेथे त्या तुलनेत हजारोंची संख्या असणारी सामूहिक साधना किती प्रभावी आणि लाभदायी होईल. **'समग्गानं तपो सुखो'** ही भगवत्वाणी येथे प्रत्यक्ष प्रकट होईल, सामूहिक तप सुखदायी सिद्ध होईल.

ह्या स्तूपामुळे अपरिचित लोकांना भ्रांती होणे स्वाभाविक आहे. त्यांना वाटते की हे एखाद्या संप्रदाय विशेषचे प्रतीक निर्माण झाले आहे. परंतु आता जेव्हा ते पाहातील की ह्या स्तूपात विपश्यना साधनेच्या व्यतिरिक्त कोणतेही सांप्रदायिक कर्मकांड केले जात नाही, येथे धूप-दीप, नैवद्य व घंटी-घंटा वा मूर्ती-पूजनाचे नावनिशान नाही, तेव्हा त्यांची ती भ्रांती आपोआप दूर होईल.

हे खरे आहे की बाहेरून ह्याला एका स्तूपाच्या आकृतीचे रूप दिल्याविनाही, दहा हजार व्यक्तींच्या सामूहिक साधनेसाठी अशा एका स्तंभविहीन विशाल सभागृहाचे निर्माण केले जाऊ शकत होते, मग ही सांप्रदायिकतेची भ्रांती निर्माण करणारी **स्तूपाची आकृती का?** लोकांची ही भ्रांतीही फार वेळ टिकून राहणार नाही, जेव्हा ते ह्या सत्याला अवगत होतील की ही आकृती चिरकाळापर्यंत **बर्माच्या उपकारांची आठवण टिकवून ठेवण्यासाठी आहे.** हा स्तूप त्या धर्म देशाच्या प्रती आमच्या **असीम कृतज्ञतेचे** प्रतीक बनेल. जेव्हा विपश्यना विद्या भारतातून शेजारी देशात गेली, तेव्हा तेथील लोकांनी आपल्या देशात जे प्रारंभिक स्तूप बनविले, ते तत्कालीन भारताच्या स्तूपांची केवळ प्रतिकृती होते. ते ह्यासाठी बनले की जेव्हा-जेव्हा तेथील लोक त्या स्तूपांना पाहातील, तेव्हा-तेव्हा **भारताच्या उपकारांची** आठवण येऊन नतमस्तक होतील. ठीक ह्याच प्रकारे येथील लोक श्वेडगोनची आकृती असणा-या ह्या स्तूपाला पाहातील तर ते ही शतकांपर्यंत **बर्माच्या उपकारांची** आठवण ठेवतील की त्या देशाने एका अनमोल ठेव्या प्रमाणे ही विद्या चिरकाळापर्यंत सांभाळून ठेवली आणि हे ही की त्या देशात गुरूदेव सयाजी ऊ बा खिनांसारखे गृहस्थ संत जन्मले, ज्यांच्या अदम्य उत्साहामुळे ही पुरातन विधी भारताला पुन्हा प्राप्त झाली आणि येथून विश्वाच्या कानाकोपऱ्यात पसरली, ज्यामुळे भारत विश्वगुरूच्या जुन्या बिरूदाला पुन्हा प्राप्त करण्यायोग्य बनला. ह्यामुळे हा स्तूप आमच्या कृतज्ञतेचे प्रतीक होईल, एखाद्या संप्रदायाचे नाही. हा **स्तूप** वस्तुतः भारतात विपश्यनेच्या पुनर्स्थापनेचे **भव्य स्मारक** होईल आणि सयाजींच्या महानतेचा **कीर्तिस्तंभही**.

## पगोडाचे निर्माण आणि ह्याच्या विशेषता

भगवान बुद्धांची अनमोल विपश्यना विद्या आणि बुद्धवाणी शतकांपर्यंत विश्वाच्या लोकांचे कल्याण करीत राहो, ह्यासाठी बुद्धवाणीत निर्देश आहेत की जेव्हापर्यंत त्यांचे शरीरधातू विश्वात कायम राहातील तेव्हापर्यंत त्यांची शिकवण कायम राहील आणि लोकांचे कल्याण करीत राहील. त्यामुळे मनात बुद्धधातूंना सुरक्षित ठेवण्याचा संकल्प जागला. ह्यासाठी परिकल्पना जागली की एक अशा **"ग्लोबल विपश्यना पगोडा"**चे निर्माण व्हावे, जो शतकांपर्यंत कायम राहील आणि साधकांना ह्याचा व्यावहारिक लाभही प्राप्त होत राहील.

हे सह्याद्रीचे क्षेत्र भगवान बुद्धाच्या काळापासूनच धर्मभूमी बनले होते. नाला-सोपाराचा ऋषी 'बाहिय दारूचीरिय' येथून श्रावस्तीपर्यंतचा रस्ता पायी चालून भगवानांना भेटावयास गेला आणि भिक्षाटणाच्या वेळी रस्त्यातच त्यांच्याजवळून धर्म शिकून जीवन्मुक्त झाला. ह्याच क्षेत्रातील श्रावक 'पूर्ण' धर्मात पुष्ट झाला आणि भगवानांव्दारे घेतलेल्या परीक्षेत सफल झाल्यावर येथे परतून लोकांना धर्म शिकविण्यात मग्न झाला. सह्याद्री क्षेत्रात बनलेल्या कान्हेरी, कार्ला, महाकाली, भाजा, अजंठा-एलोराच्या गुफा व अन्य अनेक धर्माचे स्मारक ह्या बाबीकडे निर्देश करतात की धर्म येथे किती पसरलेला असेल. नाला-सोपारात अलीकडेच झालेल्या उत्खननातून पगोड्याचे अवशेष मिळाले. ह्या सर्वांमुळे माझे मन गोराईकडे अधिक आकर्षित झाले कारण येथे तिन्ही बाजूंना समुद्राचे पाणी आणि मैंग्रोव (खाऱ्या पाण्यात वाढणारी झाडे-झुडपे) आहेत आणि एका बाजूला जमीन आहे, जेथून हे रस्त्याने जुळलेले आहे. ह्या पूर्वी पगोडा बनविण्यासाठी मी अनेक स्थानांचे निरीक्षण केले होते. परंतु ह्यालाच सर्वाधिक उत्तम समजलो.

पगोड्याला चिरस्थायी बनविण्यासाठी जुन्या पगोड्यांकडे लक्ष गेले. पाहिले की जे पगोडे दगडांनी बनविलेले आहेत ते शतकांपासून कायम आहेत, या उलट आजच्या सीमेंट-कॉंक्रिटच्या भवनांची

वयोमर्यादा १००-२०० वर्षच असते. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञ, सहायक आचार्य, ट्रस्टीज व साधकांची सभा बोलावण्यात आली. सर्वांच्या सूचना आणि सहयोगाने सिमेंट-कॉंक्रिटचा पगोडा बनविण्याऐवजी दगडांनी बनणाऱ्या एका भव्य विशाल **ग्लोबल विपश्यना पगोडा**चे निर्माण झाले. जो जवळपास २००० वर्षांपर्यंत कायम राहील. हा निश्चितच शतकांपर्यंत सयाजी ऊ बा खिनांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करीत राहण्याचे स्मारक बनेल.

ह्याच्या निर्माणाचे अजून एक कारण होते. सयाजी ऊ बा खिनांच्या परिकल्पनेनुसार पगोडा आतून रिकामा असावा ज्यात बसून लोक विपश्यना साधना करू शकतील. ह्यापूर्वी जितके पगोडे बनलेले होते,ते अधिकतर आतून भरीव होते. परंतु सयाजींनी म्यंमामध्ये आपल्या विपश्यना केंद्रात जो पहिला पगोडा बनविला त्यात साधनेसाठी **शून्यागार** बनविले. त्यांच्या ह्या वैज्ञानिक विचारांना कायम ठेऊन विश्वभरच्या विपश्यना केंद्रात जितकेही पगोडा बनले, ते सर्व त्यांच्या रंगून-विपश्यना केंद्राच्या पगोड्याची प्रतिकृतीच होते.

श्वेडगोन पगोड्याची प्रतिकृती असणाऱ्या ह्या पगोड्याच्या परिसरात भगवानांची वाणी परियत्ती, त्यांच्या जीवनाची चित्रावली व त्यांची अनमोल शिकवण विपश्यना विद्याही सुरक्षित राहील. ह्यामुळे जे लोक इथे येतील, त्याना ह्या व्यावहारिक साधनेची माहिती होईल आणि इथे ते ह्याच्या सैद्धांतिक पक्षालाही समजू शकतील. हे ही एक कारण होते अद्वितीय चिरंजीवी पगोडा बनविण्याचे.

ह्याच्या निर्माणासाठी दगडांना १,०००-१,२०० किमी. दूर राजस्थानातील जोधपूर येथून आणण्यात आले. मंदिर बनविणाऱ्या सोमपुरा शिल्पींनी ह्या प्रकारे कोरले की हे एक-दूसऱ्यात गुंतलेले राहतील व इतक्या मोठ्या पगोड्याच्या भाराला सांभाळू शकतील. ही तंत्रज्ञानाचीच कमाल आहे की ५,६४८.५ वर्गमीटर क्षेत्र असणाऱ्या विशाल सभागृहाला स्तंभविहीन बनविण्यात आले आहे. ह्याच्या निर्माणात विशेष स्केफोल्डिंग तंत्रज्ञानाचा उपयोग केला गेला. ह्या प्रकारे हा एक असा घुमट बनला, ज्यात जवळपास ८ - १० हजार साधक एकत्र बसून ध्यान करू शकतात. ह्या अर्थाने ह्याचे निर्माण निश्चितच अद्वितीय व अदभुत आहे.

**ग्लोबल विपश्यना पगोडा** चे निर्माणात प्राचीन स्थापत्यकलेसोबतच आधुनिक तंत्रज्ञान आणि मशीनींचा उपयोग केला गेला. भारतीय शिल्पींनी ह्याचा सांगाडा तयार केला तर बर्मी कलाकारांनी ह्याच्या साज-सज्ज्ये शोभायमान केले. पूर्वी- आशियाई देशांच्या सहयोगाने सोनेरी रंग चढला तर बर्मी कलाकारांनी चित्र प्रदर्शनाला सुदर्शनीय बनविले. बर्मी सागवानावर अदूभुत चित्रकारीने भरलेला विश्वाचा दूसरा सगळ्यात मोठा सरकता दरवाजा व अन्य सर्व दरवाजे बर्मामधून बनून आले. विश्वाचा सगळ्यात मोठा लाकडाचा दरवाजा बर्मातच आहे. बर्मी काष्ठ-कलाकारांनी येथे येऊन ह्याला स्थापित केले. त्यासोबतच त्यांनी ध्यान कक्षा (डोम) ची फरशी आणि शेजारी प्रतिध्वनी-रोधक लाकडाच्या पट्ट्या (बर्मी सागवान) ही लावल्या व त्याला सजविले. पगोड्याच्या बाहेरील भिंतींवर ग्रेनाईट दगडात खोदलेले धर्माचे दोहे केवळ दर्शकांच्या डोळ्यांना प्रियच वाटत नाहीत तर ते प्रेरणादायकही आहेत. पगोड्याच्या आत **पर्याप्त प्रकाश, पर्याप्त हवेचा प्रवाह,** मध्यभागी आचार्यांचा बसण्याचा **फिरणारा मंच,** प्रतिध्वनीविहीन **साउंड-सिस्टम,** ह्या सर्व आमच्या इंजीनियरांच्या डोक्यातून निघालेल्या कल्पना आहेत. ह्या प्रकारे ह्या भव्य पगोड्याचे निर्माण कार्य संपन्न करण्यात भारतीय इंजीनियर, बर्मी कलाकार, विश्वभरातील दानींचे आणि श्रद्धार्थींचे योगदान चिर-स्मरणीय राहील.

पगोड्यापर्यंत येण्यासाठी 'एस्सेल वर्ल्ड' च्या मुख्य द्वाराजवळच बनलेल्या **'सांची द्वारा'** तून आत येणाऱ्या मुख्य मार्गाच्या समातीवर पगोडा-परिसराच्या बाहेरील सीमेवर **'म्यंमा-द्वार'** बनविण्यात आले आहे. ह्याच्या दोन्ही बाजूला बर्मी संस्कृतीला दर्शविणारे दोन सिंह बनलेले आहेत. यांना बर्मी भाषेत **'छिंदे'** म्हणतात. ह्यांच्या जवळपास दगडांवर पगोड्याबाबत संक्षिप्त माहिती खोदली जाईल. ह्या द्वाराच्या नक्षीचे काम बर्मी कलाकारांद्वारे केले गेले आहे. इथूनच पगोड्यावर जाण्यासाठी संगमरवरी पायऱ्या प्रारंभ होतात. सूर्य-ताप-रोधी संगमरवरी ह्या शिळाही बर्मातून आलेल्या आहेत.

पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला आंगतुकांच्या किमती सामानाला सुरक्षित ठेवण्याची सुविधा आहे. वर गेल्यावर **सुरक्षा-तपासणी** साठी आधुनिक यंत्र लागले आहेत. ज्यांना पार करूनच कोणीही आत प्रवेश करू शकतो. तपासणी कक्षाच्या दोन्ही बाजूस **विशाल घंटां** चे चौक बनलेले आहेत, ज्यांना द्वारपालांच्या चार-चार कलात्मक मूर्ती आपल्या खांद्यावर टिकवून आहेत. एका बाजूला बर्मातून आणलेला १८.२२ मेट्रिक टनाची घंटा आहे, तर दूसरीकडे थाईलैंडहून आलेला गोल नगारा. ह्याच्या चौकावर चढून आंगतुक ह्यांना वाजविण्याचा आनंद घेऊ शकतात.

भूमीतळावर पायऱ्याच्या खाली कार्यालये आहेत. पायऱ्यांच्या उजव्या बाजूला आंगतुकांच्या सुविधेसाठी **फूड-कोर्ट** (आहार कक्ष) ची सुविधा आहे, जेथे बसून भिंतीवर बनविल्या गेलेल्या बर्मी **संस्कृतीच्या भित्ति-चित्रां** चा आनंद घेत लोक चहा-फराळ करून प्रसन्न होतात.

फूड-कोर्टच्या बाजूला एक एका संपूर्ण संगमरवरी दगडातून कोरलेली **भगवान बुद्धांची** ८७.५ मेट्रिक टन वजनाची **अखंड मूर्ती** स्थापित आहे, जी बर्मामध्ये तयार करून मोठ्या अडचणींतून पार पडत येथपर्यंत आणण्यात आली आहे. बर्मी कलाकारांनी महिनो-महिने श्रम करून ह्या परिसराला अजून अनेक प्रकारे बर्मी लोक-संस्कृतीच्या कलाकृतींनी सजविले आहे.

## पगोडा परिसराचे अन्य आकर्षण

मुख्य पगोड्याच्या उत्तर बाजूस बनलेल्या छोट्या पगोड्याचे निर्माण नमुन्याच्या रूपाने सर्वप्रथम केले गेले होते.ह्यात उपयोग केल्या गेलेल्या दगडांची भार-वहन क्षमता आणि शक्ती इत्यादींचे निरिक्षण-परिक्षण करून त्याच प्रमाणात राजस्थानच्या जोधपूरातून आलेल्या दगडांद्वारे मुख्य पगोड्याचे निर्माण केले गेले आहे.हे दोन्ही पगोडे केवळ दोन हजार वर्षांपर्यंत कायमच राहाणार नाहीत, तर ऋतू व भूकंप इत्यादींचा सामना करण्यातही सक्षम आहेत.

१५८ वर्गमीटर क्षेत्र असणाऱ्या ह्या **छोट्या पगोड्या** च्या घुमट कक्षात नवांगतुकांना रोज २५-२५ मिनीटांपर्यंत सतत आनापान (विपश्यनेचे प्राथमिक चरण) शिकविण्याचे काम केले जाते, ज्यामुळे ते ह्याचा किंचित अभ्यास करून विद्येशी परिचित होवोत आणि ह्यामुळे लाभान्वित होऊन एखाद्या दहा दिवसीय शिबिराचा पूर्ण लाभ घेवोत. ह्या प्रकारे आपल्या सोबत अन्य अनेकांच्या मंगलात सहायक बनू शकतील. विपश्यनेचा साधक मुख्य पगोड्याच्या आत बसून कधीही ध्यान करू शकतो.

पगोड्याच्या पूर्वी- द्वारा (गेट नं.१) समोर सुंदर **बगीचा** आहे. त्यात **जलदेवते** च्या हातातून निघालेला पाण्याचा आकर्षक फवारा बनलेला आहे. त्याच्या जवळच राजस्थानातून बनून आलेला १६ मीटर उंच **अशोक स्तंभ** उभा आहे. त्याच्यावर बनलेले चारही बाजूंना जबडा उघडलेले सिंह भगवान बुद्धांच्या सिंह-गर्जने (धम्मघोस) चे प्रतीक आहेत. ह्याच्या बाजूला **कमळ-तलाव** बनविण्यात आला आहे. खालील उतारावर पायऱ्यांजवळ किचन-गार्डन आहे, जेथे केंद्रासाठी लागणारा भाजीपाला उगविला जातो. ह्यामुळे परिसराचा हिरवेपणा अजून वाढतो.

बगीच्याच्या दूसऱ्या बाजूला पाण्याचा कृत्रिम धबधबा बनत आहे. ह्या एम्फीथियेटरच्या पायऱ्यांवर बसून लोक **धबधबा** आणि पगोड्याच्या बाह्य सजावटीला पाहण्याचा आनंद घेऊ शकतील.

परिक्रमा- पथावर बुद्धधातूंना नमस्कार करीत भूदेव, जलदेव, नभदेव व मुख्य पायऱ्याच्या शेवटी बुद्धधातूंना नमस्कार करीत पांढऱ्या **गजराजा** ची मूर्तीही दर्शनीय आहे.

परिक्रमा-पथाच्या खाली आणि फूड कोर्टच्या वर, **प्रथम माळ्या** वर **दर्शक-दीर्घा** बनविण्यात आली आहे, जेथे भगवान बुद्धांच्या जीवनाशी संबधित महत्वपूर्ण कथांना चित्रांच्या माध्यमाने सजीव केले गेले आहे. ही **चित्रावली** म्यंमातून आलेल्या चित्रकारांनी खूपच ध्यास आणि श्रद्धेने प्रसिद्ध चित्रकार श्री वासुदेव कामथाच्या निर्देशन व निगराणीत मला दाखवून बनविण्यात आली आहे. ह्या **चित्र-कथांना** समजण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे श्राव्य-यंत्रांच्या माध्यमाने सध्या पाच भाषेत यांना ऐकण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे-जसे-हिंदी, मराठी, इंग्रजी, बर्मी आणि थाई भाषेंपैकी आपापल्या भाषेचे श्राव्य-यंत्र कानाला लावून प्रत्येक चित्राचे विवरण ऐकता येऊ शकते.

ह्याच मजल्यावर नवीन लोकांना विपश्यना व बुद्धांसंबधी इतर माहिती देण्यासाठी वातानुकूलित **सभा-कक्षा** ची व्यवस्था केली गेली आहे, जेथे आधुनिक दृश्य-श्राव्य यंत्राद्वारे विस्तृत माहिती दिली जाते. जवळच एका **वाचनालयाचीही** व्यवस्था केली गेली आहे, जेथे बसून लोक शांतीपूर्वक वाचन करू शकतात.

असेच दर्शकांना पगोड्याच्या मधुर स्मृती जपून ठेवण्यासाठी काही **स्मृती-चिन्ह** ही उपलब्ध करविण्यात आले आहेत, ज्यांना विकत घेऊन लोक आपल्यासोबत घेऊन जाऊ शकतात. जसे-पुस्तके, ऑडिओ-व्हिडिओ सीडी-डीवीडी, पगोड्याचे स्मारक, टी-शर्ट, इत्यादी.

दूरवरून येणाऱ्या अतिथींच्या विश्रामासाठी प्रवेश-द्वाराच्या डाव्या बाजूला भोजन, निवासाच्या सुविधेसह दोन-दोन पलंग असणारे ५० खोल्यांचे चार मजली **अतिथी-गृह** बनत आहे, जे जवळपास तयार आहे. ह्याच्या निर्माणात बर्मी व थाई साधकांचे विशेष योगदान आहे.

### धम्मपत्तन विपश्यना केंद्र

पगोड्याचे निर्माणकार्य आरंभ झाल्यावर एक प्रस्ताव आला की विपश्यनेची व्यावहारिक विद्या शिकविण्यासाठी येथे एक विपश्यना केंद्र असले पाहिजे.परंतु स्थानाभावामुळे हे अशक्य वाटत होते. अशा वेळी इंजीनियरांनी सल्ला दिला की जर बहुमाळ्याच्या इमारतीत केंद्र बनविण्यास स्वीकृती मिळाली तर ह्या अत्यंत छोट्या परिसरातही जवळपास १००व्यक्तींसाठी एका छोट्या विपश्यना केंद्राचे निर्माण संभव होऊ शकते. मुंबई महानगराच्या विशेष लोकांची (एक्जीक्यूटिव्स) मागणी लक्षात घेऊन व खाडी क्षेत्र असल्यामुळे, असे केंद्र बनवण्याची स्वीकृती दिली गेली, ज्याच्या सर्व १०० शयन-कक्षांना व साधना-कक्षांना वातानुकूलित बनविले गेले. ह्या विपश्यना केंद्राचे नाव ठेवले– धम्मपतन. बर्मी कलाकृतीनी सज्जित ह्या भवनाच्या तिसऱ्या माळ्यावर आचार्य निवास बनविण्यात आला आहे व सोबतच रेकॉडिंग-स्टूडियो,सभा-कक्ष व अन्य आवश्यक निवासही. ह्या भवनाची बाह्य साज-सज्जा बर्मी स्थापत्यकलेच्या अनुरूप ह्यासाठी ठेवण्यात आली आहे, की येथेही बर्माच्या उपकारांची आठवण राहील. हे स्थान साधनेसाठी अत्यंत अनुकूल आहे. तिन्ही बाजूंनी समुद्र व खाडी असल्यामुळे शांती,सुंदरता आणि हिरवळच दृष्टीस पडते.

धम्मपतनच्या जवळ बनलेल्या छोट्या पगोड्याला साधनेसाठी केंद्राशी जोडले आहे. ह्यात एकूण १०८ शून्यागार बनलेले आहेत, जे वातानुकूलित आहेत. हे पुरुष व महिलांसाठी वेगवेगळ्या प्रवेश-द्वाराने विभक्त केले गेले आहेत. ह्यात १० दिवसीय अथवा दीर्घकालिक साधनाच होते. केंद्राच्या साधकांच्या सुविधेसाठी जिन्याव्यतिरिक्त 'लिफ्ट' ची व्यवस्थाही आहे.

धम्मपतनाच्या समोर हिरवेगार गवत व पानाफुलांनी सजलेला सुंदर बगीचा आहे, ज्याच्या मध्ये-मध्ये महिला-पुरूषांना वेगवेगळे फिरण्यासाठी चंक्रमण-पथ बनलेले आहेत. ह्यावर चालून साधकाचे मन प्रसन्नच होते. परिसराला सुंदर आणि स्वच्छ ठेवण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नारळ, खजूर व अन्य अनेक प्रकारच्या फळांचे वृक्ष लावण्यात आले आहेत.

### परियत्ती भवनात पाली भाषेचे शिक्षण

भगवानांची सारी वाणी पाली भाषेत आहे. ह्या भाषेला जीवित ठेवण्यासाठी, समजाविण्यासाठी व त्यावर संशोधन करण्यासाठी **विपश्यना विशोधन विन्यास** ची स्थापना झाली. शिबिरांदरम्यान साधक पालीचे उद्धरण आणि वंदना इत्यादी ऐकतात तेव्हा पाली भाषा जाणत नसल्यामुळे त्यांना समजण्यापासून वंचित राहतात. **पटिपत्ती** म्हणजे साधनेच्या व्यावहारिक पक्षाचा अभ्यास करण्यासोबतच **परियत्ती** म्हणजे ह्याच्या सैद्धांतिक पक्षाचाही अभ्यास आवश्यक आहे. साधकांच्या ह्या इच्छेची पूर्ती करण्यासाठी इगतपुरीत पाली भाषा शिकविण्याचे कार्य आरंभ केले गेले होते. परंतु अनेक व्यावहारिक अडचणींमुळे आता धम्मपतन केंद्राच्या जवळ असणाऱ्या भवनाला **परियत्ती भवना** त बदलून, सन २०१२ पासून पालीचा अभ्यास व संशोधनाचे कार्य मुंबईच्या ग्लोबल विपश्यना पगोड्याच्या परिसरात केले जात आहे. पाली अध्यापनासाठी निवासीय व अनिवासीय दोन्ही प्रकारचे पाठ्यक्रम उपलब्ध आहेत. ह्या संस्थेला **मुंबई विश्वविद्यालया कडून पी. एच. डी (डॉक्टरेट) पर्यंतचे प्रशिक्षण देण्याची मान्यता मिळाली आहे.** ह्या भवनात पाली अध्यापनाच्या नंतर संशोधनासाठी पुस्तकालय व कंप्युटर सुविधाही उपलब्ध आहेत,जेथे संशोधन केले जाते.

या, ह्या आश्चर्यजनक पगोडा आणि ह्याच्या परिसराच्या विशेषतांना शतकांपर्यंत जीवित ठेवण्याचा संकल्प करू आणि भगवानांची शिकविलेल्या सांप्रदायिकता विहीन वैज्ञानिक व आशुफळदाय विपश्यना विद्येला भावित करून आपले कल्याण साधू! ह्यातच सर्वांचे कल्याण सामावले आहे.

कल्याणमित्र

सत्यनारायण गोयन्का

### पगोड्यावर विभिन्न प्रसंगी झालेले समारंभ

**२६-१०-१९९७ला पगोड्याच्या शिलान्यास समारंभ** प्रसंगी खालील प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या-पूज्य गुरूदेव श्री सत्यनारायणजी गोयन्का व माताजी इलायचीदेवी गोयन्का,श्री मनोहर जोशी- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, डॉ.विपुलसारजी-महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया चे अध्यक्ष(ह्यांनी सोसायटीतर्फे भगवान बुद्धांच्या शरीर धातू प्रदान केल्या), ताईवान चे विद्वान भिक्षू श्रद्धेय गुआंग जिन, श्रीमती दमयंती रतवत्ते (श्रीलंकेच्या प्रधानमंत्री सिरिमाओ बंडारनायकेच्या प्रतीनिधीच्या रूपाने भगवानांच्या शरीर धातूंना घेऊन आल्या. ह्या श्रद्धाळू महिलेने ह्या भूमीला स्वर्णगर्भा व रत्नगर्भा बनविण्यासाठी आपल्या शरीराचे सर्व आभूषण पगोडाच्या पायाव्यात आंथरले. बर्मी श्रद्धाळूंनी थैली भरून आणलेले अनमोल रूबी व आभूषण आंथरले.) म्यंमा व अन्य देशातून आलेले श्रद्धाळू सम्मिलित झाले.

**२९-१०-२००६ ला प्रथम घुमटाचे उद्‌घाटन व धातू सन्निधान समारंभ-** पूज्य गुरूदेव श्री सत्यनारायणजी गोयन्का व माताजींच्या उपस्थितित घुमटाच्या वर मोठ्या शिलाखंडात ३०.२५ मीटरच्या उंचीवर **बुद्ध-धातूंना** सान्निधानित केले गेले. ह्या धातू ह्या प्रकारे प्राप्त झाल्या - १) महाबोधी सोसायटी ऑफ इंडियातर्फे प्राप्त धातू, २) श्रीलंका सरकारकडून प्राप्त धातू आणि ३) बर्माच्या एका अरहंताद्वारे प्राप्त धातू. सध्या प्रयत्न सुरू आहेत की सरकारने ज्या धातूंना प्रदर्शनासाठी म्यूझियम्स्‌मध्ये ठेवले आहे, ते ही येथील तीसऱ्या घुमटात बनलेल्या खणात सन्निधानित करण्यात यावे, तर ते भगवान बुद्धांच्या इच्छेनुसार दिर्घकाळापर्यंत न केवळ सुरक्षित राहतील, परंतु श्रद्धाळूंद्वारे त्यांचे पूजनही होत राहील आणि साधक त्यांच्याजवळ बसून ध्यानलाभी होतील. या उलट म्यूझियममध्ये ना कोणी श्रद्धा प्रकट करण्यास

जातो आणि ना तर ध्यानासाठी उपयुक्त जागा अथवा वातावरण मिळते. तेथे तर केवळ प्रवासी येतात जे ह्यांना पाहून आपली उत्सुकता पूर्ण करू शकतात, ह्याला सन्मान देऊ शकत नाहीत. म्हणून भगवान बुद्धांनी परिनिब्बानसुत्तात आपल्या महापरिनिर्वाणाच्या पूर्वी स्वतः म्हटले होते- *"धातू प्रदर्शनाच्या नाहीत, तर पूजन आणि सन्मानाच्या वस्तू आहेत. ह्यांना एखाद्या सार्वजनिक स्थळी, पगोड्यात सन्निधानित केले पाहिजे,जेथे सर्व स्तरातील लोक पोहचून सन्मान प्रकट करू शकतील."* विश्वास आहे की सरकार ह्या तथ्याला समजेल आणि श्रद्धाळूजन ह्याला पूर्ण करण्यात आपला सहयोग देतील.

**७-०२-२००९ला छत्रारोहण समारंभ-** म्यंमाच्या श्रद्धाळूंद्वारे प्रदत्त छत्र,त्यांच्याच हाताने पूज्य गुरूदेव श्री गोयन्काजी व माताजींच्या उपस्थितित विधिवत वर चढविले गेले.

**८-०२-२००९ ला पगोड्याचा उद्घाटन समारंभ-** श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील- भारताच्या महामहिम राष्ट्पतींद्वारे संपन्न झाला. त्या वेळी अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

## पगोड्याचा आकार-प्रकार

काही बुद्धानुयायी देशात पगोड्याला खूप महत्व दिले जाते. असा विशाल स्तूप तर अनेक शतकांनतर बनतो. श्रद्धाळूंना श्रद्धायुक्त होण्यासाठी हे चार प्रतीक आहेत-पगोडा, बुद्ध, धर्म आणि संघ.

बुद्ध जेव्हा मांडी घालून बसतात तेव्हा शरीराची रूंदी आणि उंची जवळपास समान असते. हा पगोडा जवळपास ९४.७०मी. रूंद आणि इतकाच उंच आहे जो साधनारत बुद्धांचा प्रतीक आहे. भगवान बुद्धाचे शरीर स्वर्णिम आभायुक्त होते ह्यासाठी पगोड्याला स्वर्ण रंगाने रंगविले जाते अथवा स्वर्ण-पत्रांनी आभुषित केले जाते. डोक्यावर अत्यंत कोमल मुकुट (छत्र) चढविला जातो. खालून अष्टकोनीय व वरून सोंडाकार पगोड्याची रचना आर्य-अष्टांगिक मार्गाला सूचित करते. अष्टकोनीय क्षेत्र शील, घंटाकार क्षेत्र समाधी आणि त्याच्यावरील भाग प्रज्ञेचे प्रतीक आहे. घंटाकाराच्या वरचे सात वर्तुळाकार घेरे धर्माचे सात पडाव मानले जातात, जे निर्वाणाच्या अनुभूतीसाठी आवश्यक आहेत. खालून वरची चढाई व शील ते प्रज्ञापर्यंतच्या पूर्णतेचा मार्ग संघर्षाचा मार्ग आहे. पगोडा संघाचेही प्रतीक आहे. म्हणूनच बुद्धानुयायी परिक्रमा पथावर प्रदक्षिणा करून पगोडा, बुद्ध, धर्म व संघाला नमन करतात.

## संक्षेपात मुख्य पगोड्याचे काही तांत्रिक तथ्य

| तांत्रिक माहिती | जवळपास परिमाप |
|---|---|
| पगोड्याची एकूण उंची-- | ९४.७० मीटर |
| घुमटाची(विनास्तंभ)आतील उंची-- | २६.२५ मी. |
| घुमटाचा आंतरिक व्यास-- | ८४.८५ मी. |
| घुमटाच्या आत लोकांच्या बसण्याची क्षमता -- | ८-१० हजार व्यक्ती |
| पगोड्याच्या पायाची खोली -- | २ से ७.३८ मी. |
| पगोड्याच्या भिंतीची रूंदी -- | ५.२५ से ८.७५ मी. |
| पगोड्याचे छत्र (७.५ मैट्रिक टन) -- | १४.९ मी. उंच |
| छत्राच्या वरील स्फटिक (८०किलो) -- | ०.७५ मी. |
| छत्राच्या ध्वजेची लांबी -- | १.७ मी. |
| पगोड्याचे सर्वात मोठे पूर्वी द्वार -- | ११.४ मी.रू., ६.४ मी. उं. |
| **अन्य तथ्य --------------------** | |
| उत्तर आणि दक्षिणेच्या छोट्या पगोड्याची उंची -- | १८.३० मी. |
| बर्माची घंटा (१८.२२मैट्रिक टन) -- | २.१ मी.घेर, २.१ मी.उं. |
| थाईलैंडचा नगारा -- | २.२१ मी. घेर |
| भगवान बुद्धांची मूर्ती (८७.५मे.टन)) -- | ६.४ मी. उंच |
| अशोक स्तंभ-- | १६ मीटर उंच |

**अतिरिक्त उत्तरदायित्व**

**वरिष्ठ सहायक आचार्य**

१-२. श्री सुनील व श्रीमती विद्या बागडे, विदर्भ क्षेत्रातील अ-केंद्रीय शिबिरात श्री दिगंबर धांडेची सहायता.

**नवीन उत्तरदायित्व**

**आचार्य**

1. Mr. Shirendev Dorlig, Mongolia

**वरिष्ठ सहायक आचार्य**

१. डॉ. शरद बडोले, भिलाई

**नव नियुक्त सहायक आचार्य**

१. श्रीमती श्रुति बंकर, बंगलूरू
२-३. श्री मृत्युंजय व श्रीमती हेमलता शास्त्री, जलगांव
4. Mr. Herwig Dunzendorfer, Austria

**बालशिबिर शिक्षक**

१. श्री अमित कुमार पटेल, सूरत
२. श्रीमती विलासबेन पेठानी, सुरत
३. श्रीमती अनुसूया मकवाना, सूरत
४. श्री पुरुषोत्तम पाटीदार, सूरत
५. श्रीमती वैशाली जरीवाला, सूरत
६. श्रीमती शोभना गांधी, सूरत
७. श्री मनहरलाल घीवाला, सूरत
८. श्रीमती दीपिकाबेन घीवाला, सूरत
९. श्रीमती तारूलता देसाई, सूरत
१०. श्रीमती शांताबेन चौधरी, नवसारी
११. श्री रमेशभाई चौधरी, नवसारी
१२. श्री जगदीश पटेल, बिलीमोरा
१३. श्रीमती दमयंती पटेल, बिलीमोरा
१४. श्री रतनशी पटेल, बिलीमोरा
१५. श्रीमती सरस्वती सोलंकी, ''
१६. श्री अमृत पटेल, बिलीमोरा
१७. श्री दत्तात्रेय मोरे, डैंग (गुजरात)
१८. श्रीमती राजश्री मोरे, डैंग
१९. श्रीमती सूर्यकुमारी चितलपुडी, व्यारा, (गुजरात)
२०. श्रीमती राजलक्ष्मी दूबे, सिमला
२१. कु. संगीता बगेश्वर, नई दिल्ली
२२. कु. सुरभि, नई दिल्ली
२३. श्री सुधीर कुमार नंदेकर, जबलपुर
24. Ms. Claire Coache, UK
25. Mrs. Kwah Poh Foong, Malaysia
26. Ms. Ng Jing Wen, Malaysia
27. Mr. Kenny Yip Khin Hoe, "
28. Ms.Chin Huey Fen, Malaysia
29. Mrs Monika Wilson, Australia

## दोहे धर्माचे

**शरण योग्य स्वतःचीच, न जाय अन्य शरणी।**
**स्वयं शरण सद्धर्म शरण, सुख हो सत्य वचनी॥**

**पूजन अर्चन वंदना, तर सार्थक राहे।**
**जीवनी उतरतो धर्म, पाप विसर्जित आहे॥**

## दोहे धर्माचे

**मिथ्या ती सर्व वंदना, मिथ्याच पूजा पाठ।**
**धुवे न जर मनाचा मळ, उघडे ना मन गाठ॥**
**मंदिर मशीद चैत्यात, शिर्ष नमवित राहे।**
**धर्म ना जागे किंचित, रिक्तच हात आहे॥**
**खूप वाजवितो घंटी, ढोल खूप वाजवी।**
**आत राहिली रिक्तता, मनुज जन्म घालवी॥**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org